Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.3
ISSN No. 2456-1665

# जागतिक स्तरावरील इतिहास लेखन पध्द्ती: एक आढावा

**प्रा. डॉ. गावंडे के. एस.**
इतिहास विभाग,
अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना

**प्रस्तावना:**

इतिहास लेखन पध्द्तीला एक स्वतंत्र शास्त्र मानण्यात येऊ लागले आहे. पुरातन अवशेष, शस्त्रास्त्रे, वास्तू, नाणी, शिलालेख, भूर्जपत्रे, मुद्रा, ताडपत्रे, ताम्रपट ही भौतिक साधने तर तवारिख, वखरी, दरबारी कागदपत्रे इ ही लिखित साधने त्या त्या काळातील मानवी प्रयत्न, सामाजिक घडामोडी, स्थळ व काळ यांचा निर्देश करणा-या प्रक्रियेला इतिहालेखन म्हणतात. संशोधकांनी एकत्रित केलेल्या साधनांचा अर्थ कसा लावावा त्यातून येणा-या इतिहासलेखनाला मानवी जीवनात काय स्थान द्यावे याबद्दल मागील अनेक वर्षापासून खल चालू आहे. प्रथम इतिहासलेखनाची पध्द्तशीर सुरुवात ग्रीक संस्कृतीत झाली. ती इ.स. पूर्व ६ व्या शतकात (Istoria) या शब्दाचा अर्थ वर्णन किंवा वृतांत असा नसून ज्ञान शोधणे व समजणे असा होतो. याचा अर्थ शोधाद्वारे, चौकशी आधारे प्राप्त झालेले ज्ञान म्हणजे इतिहासलेखन होय. यातूनच ग्रीकांनी इतिहासाला साधन चिकित्सा, कालमापन, स्थलनिर्देश, भाषासौष्ठव, जनजीवनाचे महत्व, कर्तबगारीच्या कर्तृत्वाचे सूत्र व कार्यकारण मीमांसा अशी विविध रुपे प्रदान केली आणि उपलब्ध माहिती संशोधनाने पडताळून त्यांनी लिखाण केले. मानवी घडामोडींचे इतिवृत्त ग्रीकांपूर्वीही लिहिले गेले असले तरी खात्री करण्याचा पायंडा ग्रीकांनीच निर्माण केला.

भूतकाळातील काही हरवलेले दूवे शोधून वा काही ऐतिहासिक सत्यावर प्रकाशझोत टाकून इतिहासकार ख-या अर्थाने गतकाळाचा पुन: प्रत्यय आणुन देतो त्याने दखल घेतली वा ना घेतली.
तरी घडामोडी हया घडतच असतात. जसे अरण्यात एखादा वृक्ष ढासळतो तेव्हा तो ढासळतांना होणारा आवाज ऐकण्यास कोणी असो वा नसो तो वृक्ष पडतो हे सत्य असते. इतिहासकाराने संशोधन केल्याने किंवा काही दुवे शोधन काढल्याने अशा ऐतिहासिक सत्यावर प्रकाश पडतो. इतिहास लेखनाच्या या प्रक्रियेत मात्र शतकानुशतके विजेत्याकडुनच इतिहास लिहिला गेला आहे. प्युनिक युध्द्याचा इतिहास हा कार्थजेनियन्सवर विजय मिळविणा-या रोमनांनी लिहिला, पेंगान्सवर विजय प्राप्त करणा-या ख्रिश्चनांनी विजयाचा टेंभा मिरविला, मेक्सिको व पेरु जिंकणा-या स्पॅनिशांनी विजयाचा इतिहास रचला व ॲझटेक्स-इंका चा जमातींना अपमानित केले.[१] तर व्यापाराच्या माध्यमातून भारत ताब्यात घेणा-या ब्रिटीशांनी प्रत्येक प्रादेशिक सत्तेचा इतिहास लिहितांना वंशश्रेष्ठत्वाचा प्रत्यय आणुन देत, तुटक, निवडक, पूर्वग्रहदुषित व जेतेपणाची भूमिका जणारे लिखाण केले.

ऐतिहासिक घटना या पूर्ण वस्तुनिष्ठ नसतात तर त्या अनिश्चित आणि व्यक्तीनिष्ठ असतात. रँकेच्या मते यासाठी कागदपत्रावर विश्वास ठेवावा लागतो ही कागदपत्रे आपल्या अधिकृतपणाचा पुरावा सादर करतात. परंतु ब्रिटिशप्रणित किंवा इतर विजेत्यांची कागदपत्रे आपल्या सोयीचे काही तरी सांगण्याचा प्रयत्न करतांना आढळतात.[२] गतघटनांचा संग्रह करणे व त्यांचे योग्य मांडणी करणे यासाठी अशा कागदपत्रांवर अवलंबून रहावे लागते. संशोधकाला हा सर्वच्या सर्व संग्रह शक्य नसल्याने कर्तव्यनिष्ठ ग्रंथपालांनी ग्रंथाचा व हस्तलिखितांचा संग्रह केलेला असतो.

सरकारी अधिका-यांनी दप्तरांची सांभाळणी केलेली असते, तर संपादकांनी संपादन केलेले असते. याच शिदोरीवर संशोधकांचे कार्य सोपे होते. अशा दप्तराचा अर्थ लावणे याचे फार मोठी जबाबदारी संशोधकावर असते. नोंद दप्तरांचा संग्रह करणे, त्याचा अर्थ लावणे, भाष्य करणे व तत्वज्ञानाच्या चौकटीत लिखाण करणे असे कार्य करावे लागते. यासाठी प्रगल्भबुध्दी, स्वतंत्र व्यक्तीमत्व व अभिनव विचारशक्ती याची गरज असते. संशोधकाच्या संशोधनशक्तीला मार्यादा असल्यातरी, त्याच्या परिज्ञान शक्तीला मर्यादा नसतात. यातुनच इतिहासलेखन साकारते.[३] शेवटी इतिहासलेखन म्हणजे तरी काय ? विखुरलेल्या अवस्थेतील भूंतकाळातील घटना व घडामोडी प्रथम आणि दिृतीय दर्जांच्या साधनांशी चिकित्सा करुन सत्यता पटवून, खात्री झाली की अनेक प्रकारच्या कसोटया वापरुन शास्त्रोक्त पध्द्तीने मांडणी करणे होय.[४] शास्त्रोक्त इतिहासकार जवळ भूतकालीन घटनांची-घडामोडींची नोंद मानवी उत्क्रांतीचा एक भाग म्हणून तो इतिहासाकडे पाहत असतो. हर्बर्टबटरफिल्डच्या मतानुसार ज्या गोष्टीतून काही निष्पन्न होते अशाच घटना लक्ष केंद्रीत करण्याच्या योग्यतेच्या असतात. म्हणूनच एखाद्या उत्तम शास्त्राप्रमाणे तांत्रिक इतिहासकारही समस्या सोडविण्यात सक्षम ठरतो. भूतकाळातील फक्त नाटयमय आणि शौर्यांच्या गोष्टीवरच भर देण्याबरोबरच नित्य नियमांच्या साध्या गोष्टीसुध्द्‌ा अभ्यासण्यास महत्वाच्या ठरतात. कारण यातूनच निती-नियम नैतिकता याची माहिती येते जी की तत्वज्ञानाचा एक भाग असते.

**इतिहास लेखनाविषयी युरोपियन दृष्टीकोनः**

लॉर्ड रोलिंग ब्रोकच्या मते इतिहास म्हणजे उदाहरणाच्या आधारे शिकवलेले तत्वज्ञान होय. ही व्याख्या सर्वकालखंडात स्मरणात ठेवण्यायोग्य आहे व न्टयुखिडाइडीस पासून टायन्वीपर्यंत सर्वांनाही मान्य आहे. याशिवाय प्लुटार्क व टॅसिटस यांच्या लिखाणात सुध्द्‌ा तत्वज्ञान होते. तर स्पिरिट ऑफ दि लॉज दि ग्रॅजर ॲण्ड डिकेडन्स ऑफ रोम हे माँटेक्स्यू चे ग्रंथ, व्हॉल्टेअरचा एज ऑफ लुई १४ गिंबनचादि डिक्लाइन ॲण्ड फॉल ऑफ दि रोमन एम्पायर ॲबेरोनॉलचा चर्च व साम्राज्य याला विरोध करणारा हिस्ट्री ऑफ दि इंडिज आणि डेव्हिड हयूमचा हिस्ट्री ऑफ इंग्लंड हे सर्व ग्रंथ तत्वज्ञानाच्याच प्रकारातील ठरतात. आधुनिक काळात तत्वज्ञानाच्या लिखाणाला नव-संशोधकांनी आपल्या लिखाणाला नव-संशोधकांनी आपल्या लिखाणात स्थान न देण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. असे असले तरी तत्वज्ञानाला पुढच्या राने हाकलून लावले तरी ते मागच्या दाराने आत सरकतेच कारण सर्व सामान्यांना इतिहासाबरोबर तत्वज्ञानसुध्द्‌ा हवे असते.

एच.जी. वेल्स, विन्स्टन चर्चिल स्पेंगलर, बेनेडिटों क्रोसे, आन्दे मॉलरा दि साल्वादोर मादारिया आणि रेमंड ॲरॉन यांनी इतिहास व तत्वज्ञान असे संयुक्तीक लिखाण के आहे.[५]

कथा, नोंददप्तरे, साधने आणि तत्वज्ञान याचा संयोग म्हणजे इतिहास परंतु सामाजिक व समाजविषयक शास्त्र अशा उघडया शब्दप्रयोगामूळे लिखाणाच्या दिशा बदलत चालल्या आहेत. तेव्हा सामाजिक शास्त्रे याला ज्ञान या मूळ अर्थाने वापरले जावे. इतिहास लेखनासाठी खास असा साचा नाही. व्यवहारज्ञान, साधने, साधनांचे वर्गिकरण यांचा उपयोग करुन प्रमाणिकपणे वस्तूनिष्ठ लिखाण केल्यास भूतकालीन घटना स्पष्ट होतात. अनेक इतिहसकारांना इतिहास लेखनाचे खास शिक्षण मिळालेले नसतांना त्यांनी इतिहासलेखन केले व त्यांची गणना महान इतिहासकारांमध्ये झाली आणि खरोखरच ते महानच होते. थ्युसीडीडस लिव्ही, प्लुटार्क, बोलींग ब्रोक, व्हॉल्टेअर हयूम मेकाले, बॅकप-ट प्रेस्कॉट, पार्कमन आणि हेन्री ॲडम्स हे सर्व हौशी इतिहासकार होते व त्यांच्या शिक्षण क्षेत्रांशी संबंधीत व्यक्तींनी इतिहास लिहावा हा प्रकार १९ व्या शतकात सुरु झाला. आधुनिक काळात सुध्द्‌ा क्रोसे, मेदारिएगा, मालरो-दि-गॉल, जॉर्ज ल्यूकस आणि विन्स्टन चर्चिल यांनी आप आपले क्षेत्र सांभाळत इतिहासलेखन केले.

Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.3 ISSN No. 2456-1665

इतिहासकाराने उद्योगशील व चिकित्सक असावे अशा व्यस्त इतिहासकारांपैकी रोमचा प्रसिध्द् इतिहासकार थिओडोर मॉमसेन अठरा तास लिखाण करत असे स्वतःच्या विवाहदिनी केवळ बारा तासच लिखाण करता आले याची त्याने खंत व्यक्त केली आहे.[६] तसेच जर्मन इतिहासकार लिओपोल्ड व्हॅन रँके याने वयाच्या ९५ व्या वर्षी जगाचा इतिहास लिहिण्याचे काम हाती घेतले होते. चिकाटी, निष्ठा, अविरत उद्योग, तासन्तास कागदपत्रांशी संवाद व सतत वर्तमानपत्रे मासिके पाहण्याची सवय लावणे काहीतरी नविन स्वतंत्र संशोधन करण्यासाठी अत्यंत गरजेचे असते. इतिहास लेखनाला विशेष अशा साच्यात बसविता येत नाही. तरीसुध्द्‌ा काही ठराविक उदाहरणे आढळतात. काही इतिहासकारांनी विशेष शैली निर्माण केली आहे. त्यापैकी गिबनची शानदार शैली, कार्लहलची उपरोधिक शैली, मेकॉलेची काव्यालक रचना मॅगनची मर्दानी झोक, पॅरिंग्टनची तेजस्वी शैली, फिलीप ग्वेडलाची चटकदार वाक्यरचना, डेनिस ब्रॅागनची सुचनात्मक शैली, पॉल हॅजर्डची उत्कट शैली, इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांची मीमांसक प्रस्तावना पध्द्‌ती, शेजवल करांची भाषा, रोखठोक कडवे भाष्य व पगडींची गोष्टी वेल्हाळ, मनोरंजक माहिती देणारे पुरावे.[७] या शैलींचा, पध्द्‌तीचा उपयोग करता येतो. परंतु विषयानुसार व स्व-ओळख निर्माण होईल असेच लिखाण करावे लागते. अर्थात अनुभवाने ही कला इतिहासकाराला अवगत होते. एखाद्या व्यावसायिक , छायाचित्रकार अथवा कारागीर ज्याप्रमाणे आवश्यकतेनुसार आपल्या पध्द्‌तीत बदल करतात त्याचप्रमाणे अनुभवी इतिहासकार योग्यवेळी योग्य शैलीचा वापर करतात.

थॉमस् वीर हा जसा इतिहासकार होता तसाच तो कांदबरीकार सुध्द्‌ा होता. स्टिफन क्रेनचे चरित्र किंवा दि मॉव डिकेड हा निबंध लिहितांना त्याने कांदबरी पध्द्‌तीने लिखाण केले तर व्हॉल्टेअर आणि ग्लडस्टन यांचे चरित्र लिहितांना शास्त्रीय इतिहासलेखन पध्द्‌तीचा वापर केला.

इतिहास संशोधकाला किंवा इतिहासकाराला आपल्या अज्ञानाचा पुरावा पावलो-पावली मिळत असतो त्यामुळे त्याने नम्रच असले पाहिजे. उपलब्ध साधनसामुग्रीचे योग्य स्पष्टीकरण करण्यासाठी त्या साधनांचे गुलाम व्हावे लागते. अनेक अडचणी, बंधने, धोके व मोहांना सामोरे जात लिखाण करावे लागते. आणि ज्या घटनेसंदर्भात माहिती हवी ती सुसंबध्द् कालक्रमाने समजावून घेतली व मांडणी केली की इतिहास लेखनाचा भाग पूर्ण होतो. उदा. मॅग्नाकार्टासनथ, बिस्मार्कने केलेले जर्मनीचे एकीकरण, साम्यवादाने चीनमध्ये मिळविलेला विजय, छत्रपती शिवाजीराजांनी स्थापन केलेले स्वराज्य की १७५७ च्या प्लासीच्या लढाईने इंग्रंजांचा भारतातील सत्ताप्रवेश अशा सर्व घटना हया साधन साहित्याच्या उपलब्धतेतून सर्व कसोटया वापरुनच त्याचे लिखाण करावे लागते. कारण ऐतिहासिक साधन साहित्याला अनेक मर्यादा असतात. त्रोटकपणा, बराच भाग कालोघात नष्ट झालेला किंवा हेतुपुरस्करपणे नष्ट केलेला भाग घेऊनच तो अधिकृत किंवा महत्वाचा याची खातरजमा करुनच घटना मांडणी करावी लागते, संबंधीत निवड केलेली ऐतिहासिक घटना ही पूर्णपणे वस्तुनिष्ठ नसते ती असते व्यक्तीनिष्ठ, अनिश्चित त्यामुळे कागदपत्रांवरच विश्वास ठेवावा लागतो. रँकेच्या मते कागदपत्रे आपल्या अधिकृतपणाचा पुरावा सादर करतात परंतु दुर्देवाने काही प्रसंगी कागदपत्रे स्वत:विषयी न सांगता आपल्या सोयीचे काहीतरी व्यक्त करत असतात. प्रत्यक्ष काय घडले हे सांगण्याऐवजी आपण काय ऐकू इच्छितो याचा अंदाज घेऊन कागदपत्रे बोत असतात. आणि म्हणुनच आयुष्यभर केलेल्या अभ्यासानतंरही निरनिराळे इतिहासकार निरनिराळी स्पष्टीकरणे देतात ते यावरुनच. शेवटी प्रसिध्द् कागदपत्रे स्वत:च स्पष्टीकरण करु शकत नाही. त्यांना इतिहासकारच आकार देतो. पैकी बरेच इतिहासकार पक्षपातीपणा टाळण्याचा प्रयत्न करतात. काहींना हे जमत नाही कारण विषय, साधन, संपादन पध्द्‌त, मानसिक तोल, कळत-नकळत पूर्वग्रहाचे, कालाचे, वंशाचे, श्रध्द्‌चे, वर्गाचे आणि देशाचे ते गुलाम असतात. या सर्व गोष्टींना ते ऐतिहासिक लेखनात गृहीत धरतात इतकेच नव्हे तर यांचे ते भांडवलसुध्द्‌ा करतात.

ब्लेरेंडनचा हिस्ट्री ऑफ दि रिबेलियन किंवा ॲबरेनॉलचा फिलॉसॉफीकल हिस्ट्री ऑफ दि इंडियन या दोन्ही ग्रंथाचा विषय चर्चच्या वर्चस्वाला तडा देणे हा होता. परंतु भाट हा प्रचारकी होतो. शिवाय फ्रेडीक मॅसनने लिहिलेले प्रशंसाभाटाचे नेपोलियनचे चरित्र, हेन्री विल्सन लिखित राइज ॲण्ड फॉल ऑफ दि स्लेव्ह पॉवर इन अमेरिका हा ग्रंथ, चार्ल्स ए बिअर्ड याने केलेले दोन महायुध्द्याच्या दरम्यान अमेरिकेच्या परराष्ट्र संबंधाबाबतचे लिखाण विन्स्टन चर्चिलचा वर्ल्ड क्रत्यसिस हा ग्रंथ हे सर्व पक्षपातीपणाचे नमूने ठरतात. परंतु दूर्देवाने असे लिखाण धार-धार बनते. कारण लेखकाने विशिष्ट वर्गाच्या वाचकांची मने हेलविण्याचा प्रकार केल्याचे दिसते.[८] याचा अर्थ सरसकट इतिहास हा विषयच शास्त्रशुध्द् नाही. तो कमालीचा पक्षपाती आहे. इतिहासकाराच्या व्यक्तीगत भावनांचे प्रतिबिंब लिखाणात येते असा खेदजनक नाही, शंभर टक्के बरोबर असा कोणताच विषय नसतो कितीही प्रयत्न केला तरी इतिहासकार हा वर्तमान काळाच्या चष्म्यातून भूतकाळाकडे पाहतो.

जी जबाबदारी न्यायाधिश, शिक्षक, डॉक्टर किंवा स्थापत्यशास्त्रज्ञ यांच्यावर असते तीच जबाबदारी इतिहासकारावही असतेच. म्हणूनच उपलब्ध पुराव्यांचा प्रयत्नपूर्वक अभ्यास करुन आणि आपला दृष्टीकोन दुषित व विकृत करणारा सर्व घातक पुरावा बाजूला सारुन जेव्हा वस्तुनिष्ठ लिखाण इतिहासकार करतो तेव्हा इतिहासवाद (Historicism) या अंतीम पदापर्यंत संशोधन गेलेले असते. शेवटी ज्यांच्या विषयी संशोधन व लिखाण करावयाचे आहे त्यांच्या मनाशी संपर्क साधता येणे महत्वाचे असते.[९] संपूर्ण भूतकाळ समजावून देईल आणि भविष्याचा प्रवाहही दर्शवील अशा व्यापक ऐतिहासिक नियमाचे संशोधन करण्याचे स्वप्न कांट, हेगेल, मार्क्स, एजंल्स आणि टायन्बी अशा अनेक विद्ववानांनी उराशी बाळगले होते. याच प्रक्रियेतून उपयुक्ततावादी इतिहासलेखन, स्वच्छतावादी इतिहासलेखन रुबाल्टन पध्द्ती साम्राज्यवादी आणि वसाहतवादी अशा विविध पध्द्ती विकसित झालेल्या दिसतात.

शेवटी इतिहासलेखनात नैतिक आणि व्यावसायिक मूल्यमापनाची कधीही गल्लत करता येत नाही. व्यावसायिक पात्रतेच्या क्षेत्रात निकालपत्र देणारा न्यायाधीश, रोगाचे निान करणारा डॉक्टर, श्रेणी बहाल करणारा शिक्षक किंवा एखाद्या इमारतीच्या बांधकामातील दोष निदर्शनास आणाणारा स्थापत्यशास्त्रज्ञ यांच्या डोक्यावर जी जबाबदारी असते तीच जबाबदारी इतिहासकारांवरही असते.

जागतिक इतिहासलेखनाच्या प्रवाहात ही जबाबदारी अनेकांनी यशस्वीपणे स्वीकारलेली दिसते. हीरोडोटस (इ.स.पूर्व ४८४-४२४) याने तत्कालीन महत्वपूर्ण घटनांची व व्यक्तींची नोंद केली. त्यानंतर थ्युसिडीडस (इ.स. पूर्व ४७१-३९९), झेनोफन (इ.स.पूर्व ४३०-३५५) मॅनेयो (इ.स.पू. तिसरे शतक), बेरॉसस (इ.स.पू. तिसरे शतक) या ग्रीक इतिहासकारांनी उपलब्ध साधनांद्वारे तत्संबंधित घटना व काळ यांचा विश्वसनीय माहिती देण्याचा प्रयत्न केला. थ्युसिडीडसने तर शास्त्रीय इतिहासलेखनाचा पाया घातला. त्याने पेलोपोनीशियन युध्द् आणि अथेन्सच्या प्रभुत्वाचा इतिहास, घटनांची निवड व पुराव्याचा तौलानिक अभ्यास केला.

हा आदर्श समोर ठेवूनच पुढील इतिहास लेखन पध्द्तीची वाटचाल झाली. रोमनांचे इतिहासलेखन याच प्रभावाखाली झाले एवढेच नव्हे तर त्यांच्या इतिहास लेखनाची प्रारंभीची भाषा सुध्द्ा ग्रीकच होती. टायटस लिव्ही (इ.स.पू. ५९-इ.स.९६) टॅसिटस (इ.स. ५५-१२०) प्लुटार्क (इ.स. ४६-१२०), स्विटोनिअस (इ.स. ६९-१००) या रोमन इतिहासकारांवर ग्रीक प्रभाव जाणवतो.

रोमन साम्राज्याच्या विस्ताराने इतर युरोपीयन देशात इतिहासलेखन होऊ लागले. आणि ख्रिस्ती धर्माच्या प्रसाराने त्या धर्माच्या धर्मोपदेशकांनी तत्कालीन घटनांची नोंद करुन व अन्य हस्तालिखितांच्या नकला करुन ती साधने आपापल्या प्रार्थनास्थळी व धर्मवास्तुत जतन करण्याचे महत्वाचे कार्य केले. परंतु

यात धार्मिक पूर्वग्रहांचा पगडा आणि प्रत्येक ऐतिहासिक घटना म्हणजे मानवाच्या कल्याणासाठी परमेश्वराने तयार केलेल्या योजनेचा एक भाग असते अशी भावना युरोपखंडामध्ये निर्माण झाली.

युरोपमध्ये मध्ययुगीन कालखंडात धर्मसंस्थेचे वर्चस्व निर्माण झाल्याने अंधश्रध्दा व काल्पनिक कथानक याचा प्रभाव वाढला यामुळे इतिहासलेखनाच्या शास्त्रीय पध्दतीला खीळ बसली. रनेदेकार्त (१५९६ ते १६५०) यांच्या वैचारिक प्रभावाने इतिहासलेखनशास्त्रच अस्तगंत होते की काय अशी भीती निर्माण झाली. ईश्वर परिपूर्ण पदार्थ आहे जो आत्मकारण असून सर्व द्रव्य, घन पदार्थांचे अस्तित्व त्याच्या पासूनच प्रारंभ होते व संपते.[१०] अशी त्याची विचारसरणी होती. युरोपखंडातील ही परिस्थिती सुदैवाने प्रबोधनाच्या प्रवाहात वाहत गेली व बुध्दीच्या निकषावर प्रत्येक घटना घासून पाहण्यास प्रारंभ झाला. प्राचीन ग्रीक व रोमन संस्कृतीच्या अभ्यासाला गती मिळाली. वास्तव व वस्तूनिष्ठता यांना स्थान देऊ लागले. नवीन राष्ट्रांचा उदय झाला, वसाहतवाद, व्यापारवृध्दी आणि परिवर्तन याचा इतिहासलेखनावर सकारात्मक परिणाम झाला व इतिहालेखनावरील ख्रिस्ती धर्मकल्पनेची पकड सैल घेऊन मॉटेंस्कयू, व्हॉल्टेअर हे फ्रेंच, एडवर्ड गिबन, विल्यम रॉबर्टसनसारखे ब्रिटिश तर ऑडोल्प शिमटसारखे जर्मन इतिहासकार घटनांना तपासून घेत इतिहासलेखन करु लागले.

व्हाल्टेअरने तर आधुनिक तत्वज्ञानाची पायाभरणी करतांना मोलाचे योगदान दिले. राजे-रजवाडे त्यांच्या युध्द मोहिमा यातच इतिहासाला मर्यादित करण्यापेक्षा समाज, मानवी मनाचे संस्कृतीकडे झालेल्या वाटचालीची कहाणी होय. त्याने आपल्या लिखाणात इतिहासज्ञच्या विकास पक्रियेबाबत गूढ व अलौकिक स्पष्टीकरण अमान्य करुन नैसर्गिक कारण परंपरेवर भर दिला.[११] या विश्लेषणाची मदत घेत अनेक इतिहास अभ्यासकांनी आपआपल्या देशात इतिहास संशोधन करुन प्रगतीचे मूल्ये सापेख असतात असे दाखवून दिले आहे. इतिहासाच्या शास्त्रीय अभ्यासाला भाषाशास्त्राच्या अभ्यासाने चालना मिळाली. बाटोल्ट नीबूर (१७७६-१८३१) या जर्मन इतिहासकाराने मूळ साधनांचा चिकित्सक अभ्यास करुन रोमचा इतिहास लिहिला त्याचा नतंरच्या इतिहासलेखनावर असा परिणाम झाला की बाटोल्ट निबीरच्या शिष्याने म्हणजे लीओपोल्ड राँके याने (इ.स. १७९५-१८८६) इतिहासलेखनाला शास्त्रीय स्वरुप दिले. त्याच्या मते इतिहास संशोधकाने तत्कालीन अथवा तत्पूर्वीच्या ऐतिहासिक साधनांची सत्यसत्यता पडताळून विश्वसनीय अस्सल साधनांचा आधार घेऊनच इतिहास लेखन करावे. त्याचे हे मत पुढे इंग्लंड व अमेरिकेत रुढ झाले. त्याच्या स्वत:च्या लिखाणात राष्ट्रवाद व प्रगतिवाद यांचा योग्य समन्वय साधण्याचा त्याने प्रयत्न केला आहे.

राष्ट्रीय विचारसरणीच्या लेखनाला बाटोल्ट नीबूर व रँकेच्या योगदानाने गती मिळाली. तसेच ऑगस्त कॉम्त (१७९८-१८५७) या फ्रेंच तत्ववेत्त्याने समाज-विकास या गोष्टीकडे इतिहाससंशोधकांचे लक्ष वेधले की, इतिहासही एक सामाजिक शास्त्र असल्याने त्यातील मूलभूत नियम शोधणे शक्य आहे असे प्रतिपादन केले.

एच.टी. बकल (इ.स. १८२१-१८६२) विल्यम लेकी (१८३८-१९०३), टॅओडोर मोमेझेन (१८१७-१९०३) या इतिहासकाराच्या प्रयत्नामुळे व लिखाणामुळे इतिहासशास्त्राला उच्च दर्जाचे स्थान मिळाले.[१२] सामुहीक मनात ऐतिहासिक घटनांचे मुळ शोधतांना तौलनिक पध्दतीने शोधण्याचा प्रयत्न केल्यास इतिहास सर्व शास्त्रांच्या अभ्यासाचा महत्वाचा घटक होय असे प्रतिपादन कार्ल लॉम्प्रेख्ट (१८५६-१९१५) याने केले. आव्हानोप्रत्युत्तर या सिध्दांतावर सर्व संस्कृतीविकास मांडणा-या अर्नोल्ड टायन्बी (१८८९-१९७५) या महान इतिहासकारावरही कार्ल लॉम्प्रख्ट याचा प्रभाव दिसून येतो.

युरोप खंडातील या इतिहासलेखनाच्या घडामोडी घडत असतांना अमेरिकेत सुध्दा जॉर्ज बॅक्रॉप-ट (१८००-१८९१), चार्ल्स बिअर्ड (१८४४-१९४८), हेन्री ॲडम्स् (१८३८-१९१८) या इतिहासकारांच्या योगदानाने ज्ञानाच्या विविध शाखामध्ये इतिहासशास्त्रास मानाचे स्थान प्राप्त झाले. तसे

१९ व्या शतकातील इतिहासलेखन प्रक्रियेवर प्रामुख्याने औद्योगिक क्रांती, लोकशाही तत्वप्रणालीचा विकास व डार्विनचा उत्क्रांतीवाद याचा परिणाम झालेला दिसतो. तर समाजाच्या अर्थरचनेची जाणीव कार्ल मार्क्सच्या वर्गकलह या तत्वज्ञानाने करुन दिली. यामुळे इतिहास हा सर्वांगिण बनला. तो विशिष्ट देश, कालखंड किंवा व्यक्ती यांच्यापुरता मर्यादित न रहाता सर्व मानवी संस्कृती त्यात आली पाहिजे असा बनला. हाच विचार बळावत जाऊन आजच्या आधुनिक इतिहासलेखनाचे प्रारुप निर्माण झाले.

**संदर्भ :**

१. वळसंगकर कृ.ना., इतिहासाचे स्वरुप व अभ्यास मॅजेस्टिक प्रकाशन, पुणे १९७४, पृ.६
२. जॉन्सन रॉबर्ट- द मिनींग ऑफ हिस्ट्री ॲण्ड अदर पिसेस, न्युयार्क, १९४४, पृ. ५
३. वळसंगकर कृ.ना., इतिहासाचे स्वरुप व अभ्यास मॅजेस्टिक प्रकाशन, पुणे १९७४, पृ.९
४. राजदरेकर सुहास, इतिहासलेखन शास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर, १९४८, पृ. १
५. डेव्हिड व्हिल्सन- द गेटवे टू हिस्ट्री, एन.वाय. डब्ल्यू ॲण्ड कंपनी, गार्डन सिटी, १९६२, पृ. ३७९.
६. कित्ता पृ. ३९३.
७. राजदरेकर सुहास, इतिहासलेखन शास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर, १९४८, पृ. १
८. वळसंगकर कृ.ना., इतिहासाचे स्वरुप व अभ्यास मॅजेस्टिक प्रकाशन, पुणे १९७४, पृ.१४
९. जॉन्सन रॉबर्ट- द मिनींग ऑफ हिस्ट्री ॲण्ड अदर पिसेस, न्युयार्क, १९४४, पृ. १०९.
१०. डॉ. देशपांडे, सुरेश रघुनाथ - मराठेशाहीचे आधुनिक भाष्यकार, गोकुळ मासिक प्रकाशन, सदाशिव पेठ-पुणे, १९९४, पृ. २.
११. कित्ता, पृ. ४